# प्रेसनोट

पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण दलाची पोलीस शिपाई चालक भरती-२०२१ मध्ये पोलीस शिपाई चालक पदासाठी लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार दि.२६.०३.२०२३ रोजी सकाळी ०८.३० ते १०.०० या कालावधीत पोलीस परेड मैदान, ठाणे शहर पोलीस मुख्यालय, कोर्टनाक्याजवळ, ठाणे पश्चिम, येथे घेण्यात येणार आहे. पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे. परिक्षा केंद्रावर उमेदवारांनी ०२ (दोन) तास अगोदर सकाळी ०६.३० वा. पोहोचणे आवश्यक आहे. सोबत येताना महाआयटीकडून लेखी परिक्षेकरीता दिलेले ऑनलाईन प्रवेशपत्र, तसेच या कार्यालयाकडून यापूर्वी गोल शिक्का मारुन दिलेले प्रवेशपत्र व दोन पासपोर्टसाईज फोटो आणावेत.